# को.ए.सो. बळीराम गणा ठाकूर विद्यालय, वढाव

को.ए.सो. बळीराम गणा ठाकूर विद्यालय, वढाव, ता.पेण जि.रायगड ही शाळा ग्रामीण भागातील असून उत्तम प्रगतीपथावर वाटचाल करणारी आहे.

अहवाल वर्षी विद्यालयाचा एस.एस.सी. परीक्षा मार्च २०१६ चा निकाल १००% लागला. या वर्षी कु. स्नेहा गणेश म्हात्रे हीने ८४.६०% गुण मिळवून प्रथम येण्याचा मान मिळवला. कु. सुबोध गणेश म्हात्रे हा ७९.४०% गुण मिळवून द्वितीय व कु. चेतन जयवंत वर्तक हा ७७.००% गुण मिळवून तृतीय आला. शाळेचा निकाल वाढविण्याच्या दृष्टीने शाळेत ज्यादा तासिका, सराव परीक्षा, उजळणी वर्ग, पालक भेट योजना इ. उपक्रम राबविले जातात.

१५ जून २०१६ या शाळेच्या पहिल्या दिवशी शाळेतील विद्यार्थ्यांचे मुख्याध्यापकांनी गुलाबपुष्प देवून स्वागत केले. त्यानंतर इ. ५ वी ते ८ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत मोफत पाठ्यपुस्तके मा.चेअरमन यांच्या हस्ते देण्यात आली. तसेच शाळेत नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले.

को.ए.सो. आंतरशालेय वाक्स्पर्धा, निबंधस्पर्धा, चित्रकला स्पर्धा यामध्ये शाळेतील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यामध्ये को.ए.सो. आंतरशालेय निबंध स्पर्धेत मराठी, हिंदी, इंग्रजी या तीनही विषयात कु. साक्षी गजानन ठाकूर (इ. ५ वी) हिस प्रथम क्रमांक मिळाला. तसेच चित्रकला स्पर्धेत उत्तेजनार्थ बक्षिस मिळाले. कु. श्रद्धा हरिश्चंद्र म्हात्रे हिस हिंदी निबंध स्पर्धेत तृतीय क्रमांक मिळाला. कु. सिद्धेश नवनीत म्हात्रे यास इंग्रजी निबंध स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळाला.

तसेच वढाव पंचक्रोशीतील झालेल्या जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत कु.साक्षी गजानन ठाकूर (इ.५वी) हिस प्रथम क्रमांक मिळाला, त्याबद्दल तिला रोख रक्कम रू. १००१/- देवून सन्मानित करण्यात आले. व वाक्स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला, त्याबद्दल तिला रोख रक्कम ७०१ रू व चषक देवून सन्मानित करण्यात आले. शाळेतील सहा.शिक्षक श्री. दशरथ छगन गोसावी यांना एम.के. सी.एल. मुंबई येथे झालेल्या राज्यस्तरीय हस्ताक्षर स्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला. त्याबद्दल त्यांना रोख रक्कम रू. १५०००/- व चषक देवून सन्मानित करण्यात आले. डॉ. अब्दुल कलाम यांच्या वाचन दिनानिमित्त जिल्हास्तरीय निबंधस्पर्धेत द्वितीय क्रमांक मिळाला त्याबद्दल त्यांना रोख रक्कम रू. २,५५१ व डॉ. अब्दुल कलामांचे पुस्तक देवून सन्मानित करण्यात आले. नरहरी शंकर जोशी संस्थान ठाणे मार्फत राज्यस्तरीय निबंधस्पर्धेत तालुक्यातून निवड झाल्याबद्दल एक वॉटर प्युरिफायर, रोख रक्कम ५५१/- रू व घड्याळ व भेटवस्तू देवून सन्मानित करण्यात आले.

अहवाल कालावधीत सी.एफ.आय. पेण या समाजिक संस्थेमार्फत विज्ञान वाहिनी पुणे यांच्या सौजन्याने फिरती प्रयोगशाळा अंतर्गत इ. ८ वी ते १० वी च्या सर्व विद्यार्थ्यांना वैयक्तिक प्रयोग करण्यास दिले. तसेच इ. ५ वी ते ९ वी च्या सर्व विद्यार्थ्यांना अंधश्रद्ध निर्मुलन व सर्प एक मित्र यावर चित्रफितीमार्फत मार्गदर्शन करण्यात आले.

शालेय विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकासासाठी शाळेचे मा.चेअरमन, शाळा समिती सदस्य, मा.मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, तसेच संपूर्ण शाळा व्यवस्थापन समिती विविध उपक्रमांचे आयोजन करून शाळेच्या अडचणी सोडविण्यासाठी सदैव प्रयत्नशील असतात. यामध्ये सर्व विद्यार्थी व पालक याचेही सहकार्य लाभते.


कु. म्हात्रे स्नेहा गणेश
एस. एस.सी. (८४.६०%)


कु. म्हात्रे सुबोध गणेश
एस. एस.सी. (७९.४०%)


कु. ठाकूर साक्षी गजानन
जिल्हास्तरीय चित्रकला स्पर्धेत यश


श्री. गोसावी दशरथ छगन
हस्ताक्षर स्पर्धेत द्वितीय


वार्षिक स्नेहसंमेलना प्रसंगी व्यासपिठावर उपस्थित मान्यावर


वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रम सादर करताना शालेय विद्यार्थींनी